# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात कामगार ब्युरोची स्थापना करणेबाबत

**(१) ३२७१२ (१२-०१-२०२२). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मनुष्यबळाची टंचाई भासू नये यासाठी कामगार ब्युरोची स्थापना करण्यात येणार असल्याचे मा.उद्योग मंत्री यांनी १५ मे, २०२० रोजी वा त्या सुमारास जाहीर केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योगांना लागणारे कुशल, अकुशल मनुष्यबळ सात दिवसात पुरविण्याचे नियोजन उदयोग विभागाने केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक प्रकल्पग्रस्ताना नोकरीत प्राधान्याने सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०१-१२-२०२३) :** (१) कोविडच्या प्रादुर्भावामुळे राज्यातून अनेक कामगार स्थलांतरीत होत असल्याची परिस्थिती निर्माण झाल्याने मनुष्यबळाची टंचाई भासू नये यासाठी महाजॉब्स या नावाने ऑनलाईन पोर्टल तयार करण्यात आले होते.

(२) महाजॉब्स या पोर्टलवर ईच्छूकांनी नोंदणी केल्यावर त्यांना त्यांच्या कौशल्याप्रमाणे विभागणी करुन अवघ्या काही दिवसात कामगारांना प्रशिक्षण देऊन उद्योगांची गरज भागविण्याचा उद्देश या महाजॉब्स पोर्टलचा होता.

(३) अ) लॉकडाऊन नंतर स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध व्हावा याच हेतूने महाजॉब्स पोर्टलची निर्मिती करण्यात आली होती.

ब) आपला प्रोफाइल पूर्णपणे यशस्विरित्या भरलेल्या अकुशल तरूण-तरुणींना योग्य त्या क्षेत्रात नोकरी मिळविण्याकरीता तांत्रिक प्रशिक्षण देण्यास्तव शासनाच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागास कळविण्यात आले होते.

क) महाजॉब्स या पोर्टलची अंमलबजावणी विषयक कामकाज क्षेत्रीय स्तरावर करण्याकरीता संस्थेची नेमणूक करण्यास निविदा प्रक्रियेव्दारे निवड करण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या शासनाकडे अनेक प्रलंबित मागण्याबाबत

**(२) ३७९५७ (०७-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.किरण लहामटे (अकोले), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये ६० कर्मचारी असून कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी नागपूर येथे लॉग मार्च दिनांक १० जुलै २०१८, तर दिनांक ७ जानेवारी, २०१९ रोजीच्या लातूर येथील अधिवेशनात तसेच उक्त मागणीसंदर्भात आंदोलन केले असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, लातूर येथे अधिवेशन कालावधीत उपस्थित मा.ग्रामविकास मंत्री व मा.कामगार मंत्री यांनी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर शासन सकारात्मक निर्णय घेईल असे त्यावेळी दोन्ही मा.मंत्री महोदयांनी सदर अधिवेशनात घोषित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा वाढीव वेतन, वेतनासाठी वसुलीची अट रद्द करणे, पेन्शन लागू करणे, दहा टक्के सेवाज्येष्ठतेनुसार जिल्हा परिषद मध्ये सामावून घेणे इत्यादी मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत व आकृतिबंधाबाबत शिफारस करण्यासाठी अभय यावलकर, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली सन २०१७ मध्ये समिती गठीत करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्या अहवालातील शिफारशी चे स्वरुप काय आहे,

(६) असल्यास, समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०४-०१-२०२४) :** (१) व (२) होय,हे खरे आहे,

(३) नाही,हे खरे नाही, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) यावलकर समितीने लोकसंख्या वाढीस अनुसरून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा आकृतीबंधात सुधारणा व वेतनश्रेणी संदर्भात शिफारशी केल्या आहेत.

(६) यावलकर समितीने शिफारस केलेल्या आकृतीबंधाचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आला असता,वित्त विभागाने काही मुद्याबाबत माहिती मागविली आहे. त्याअनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून माहिती मागविण्यात आली आहे.

---

**मौजे वनपुरी (ता.पुरंदर,जि.पुणे) पुणेसह राज्यात पाणी व्यवस्थापनात लोक सहभाग वाढविण्याबाबत**

**(३) ४१५८८ (०१-०४-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वनपुरी (ता.पुरंदर,जि.पुणे) या गावाने ५० टक्क्यापेक्षा जास्त ठिबक सिंचन पध्दतीचा वापर करुन लोक सहभागातून १५ कोटी लिटर पाणी बचत करुन एक आदर्श गाव असल्याचे दिनांक २८ डिसेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास दाखवून दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन राज्यातील अतिशोषित गावांत उपलब्ध व उपयुक्त पाण्याचा वापर करुन पाणी बचत करण्याचा वनपुरी गावाचा आदर्श इतर गावांनाही मिळावा यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरहू वनपुरी गावाला पुरस्काराने सन्मानित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-१२-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) कृषी विभागाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत सदर गावातील एकूण १८ शेतकऱ्यांना व एकूण ११.५१ हेक्टर क्षेत्रास ठिबक व तुषार सिंचनाचा लाभ देण्यात आला आहे. तसेच प्रति थेंब अधिक पिक, मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना तसेच अटल भूजल योजना यासारख्या शासकीय योजना शासनाच्या कृषी विभागामार्फत राज्यात तसेच पुणे जिल्ह्यात राबविल्या जात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील बोईसर बायपास रस्त्याच्या दुरावस्थेबाबत**

**(४) ४८६१० (२२-०९-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील बोईसर बायपास रस्ता हा तारापूर रस्त्याला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा रस्ता असून सदर रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्ता चाकरमान्यांसाठी व स्थानिक नागरीकांसाठी सोईचा असून उक्त रस्ता दुरुस्तीबाबत शासनस्तरावर कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-१२-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदर रस्ता सिडको प्राधिकरण यांच्या अखत्यारीत असून बोईसर ग्रामपंचायत सदर रस्त्याची देखभाल दुरुस्ती करीता आहे. सदर रस्ता ४१० मीटर लांबीचा असून १०० मीटर लांबीचा रस्ता ग्रामपंचायत निधीतून व १९० मीटर लांबीचा रस्ता मुंबई महानगर प्रादेशिक विकास यंत्रणेकडून पूर्ण करण्यात आला असून १२० मीटर लांबीच्या रस्त्याचे काम बाकी आहे.

लेखाशीर्ष २५१५ १२३८ या योजनेंतर्गत मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासन मान्यतेने मंजुरी देण्यात येते. पालघर जिल्ह्यासाठी स्थानिक मा. लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेऊन शासन मान्यतेने सन २०२२-२३ मध्ये रु.१५००.०० लक्ष रक्कमेच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. लेखाशिर्ष २५१५ १२३३८ योजनेंतर्गत सदर विकास कामे घेण्यास मा.लोकप्रतिनिधींना मुभा आहे. सबब, योजनेतील अटी व शर्तीनुसार त्यातून सदर विकास काम करणे शक्य आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे विसापूर (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील जिल्हा परिषद शाळा सुरु ठेवण्याबाबत**

**(५) ४९५२६ (१९-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विसापूर (ता.बल्लारपूर जि,चंद्रपूर) येथील लोकसंख्या १८ हजारांवर असून तेथील जिल्हा परिषदेच्या शाळेत मोफत शिक्षण मिळत असतांना देखील सदरहू शाळा बंद करण्याचा निर्णय जिल्हा परिषद,चंद्रपूर यांनी माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असल्याचे निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्याची कारणे काय आहे याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शाळा बंद न करता सुरु ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सद्यास्थितीत सदर शाळेच्या परिसरामध्ये माध्यमिक शिक्षणाची सोय असणाऱ्या १२ शाळा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. त्यामुळे सदर शाळेत दरवर्षी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प असून पटसंख्या देखील कमी झालेली असल्याने शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाकूर (जि. लातूर) मुलांची जिल्हापरिषद शाळेची नवीन इमारत बांधण्याबाबत

**(६) ५०५८५ (२१-०१-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर (जि.लातूर) शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली जिल्हा परिषदेच्या शाळेच्या इमारतीला १०० वर्ष झाली असून सदर शाळेला सध्या सेवक नसल्याने मुख्याध्यापक, शिक्षकांना स्वत:च शाळेची साफसफाई करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच, जिल्हा परिषदेमधील मुलींच्या शाळेला देखील ८० वर्षे झाली असून या शाळेचीही बिकट अवस्था होऊन शाळेवरील पत्रे व पत्र्याखालील आडू हे जीर्ण झाले असून इमारतीच्या भिंतीही धोकादायक झाल्यामुळे या खोल्यांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये पाण्याची गळती होत असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोन्ही शाळा इमारती पाडून नवीन शाळा इमारती उभारण्याबाबत मा. उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम, चाकूर (जि. लातूर) यांनी शासनाकडे किती रक्कमेचा आणि केव्हा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, उक्त नवीन शाळा इमारती उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-१२-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

सदर शाळा धोकादायक असल्याने पाडण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) असा कोणताही प्रस्ताव प्राप्त नाही.

(४) शालेय शिक्षण विभागाच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत जि.प.कन्या प्रशाला, चाकूर साठी नवीन ७ वर्गखोली बांधकामासाठी रु.८२.०२ लक्ष ची तरतूद करण्यात आलेली आहे.

तसेच मुलांच्या प्रशालेच्या दुरुस्तीसाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रु.१८ लक्ष ची तरतूद करण्यात येवून सदर काम निविदास्तरावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हा परिषद व जत पंचायत समिती मध्ये महत्त्वाच्या पदावर भारी नियुक्तीने अधिकारी कार्यरत असलेबाबत

**(७) ५३१३० (२०-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषद व जत पंचायत समिती मध्ये अनेक अत्यंत महत्त्वाच्या पदावर प्रभारी नियुक्तीने अधिकारी कार्यरत असल्याने महत्वाच्या कामकाजासाठी अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने महत्त्वाच्या पदावर कायम नियुक्ती करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-१२-२०२३) :** (१) जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत गट-अ व गट-ब संवर्गातील एकूण १०६ मंजूर पदांपैकी ५७ पदे कार्यरत असून ४९ पदे रिक्त आहेत. तसेच पंचायत समिती, जत अंतर्गत गट अ व गट ब संवर्गातील एकुण ४० मंजुर पदापैकी १३ पदे कार्यरत असून २७ पदे रिक्त आहेत. तथापि, सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांना सोपविण्यात आला असून त्यांच्यामार्फत कामकाज पार पाडण्यात येत आहे.

(२) जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ संवर्गातील सर्व पदे कार्यरत आहेत.तसेच,गट-ब संवर्गातील सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जत हे पद रिक्त आहे. सदर पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू असून अन्य प्रशासकीय विभागातंर्गत जिल्हा परिषद, सांगली येथील गट-अ व गट-ब संवर्गातील पदे भरण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात हिंगोली जिल्ह्यातील सन २०२१- २२ च्या आर्थिक वर्षातील युवक कल्याण योजनेत झालेल्या अनियमिततेबाबत

**(८) ५३३७७ (१८-०१-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील युवक कल्याण योजनेमध्ये सन २०२१-२२ च्या आर्थिक वर्षातील अनियमिततेबाबत दाखल झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समितीने दस्ताऐवजाची मागणी क्रीडा विभागाकडे केली असता माहिती पुरवण्यास टाळाटाळ होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्रीडा उपसंचालकांना माहिती मिळाली नसल्याने विशेष घटक योजनेतील निधीच्या खर्चावर या चौकशी समितीने निर्बंध आणले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशी समितीने अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(४) असल्यास, सदरहू अहवालाच्या अनुषगांने समितीने कोणत्या शिफारशी केल्या आहेत त्याचे थोडक्यात स्वरुप काय तसेच शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०८-१२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

सन २०२१-२२ या वर्षातील युवक कल्याण योजनेअंतर्गत हिंगोली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे मंजूर केलेल्या अनुदानामध्ये अनियमितता झालेबाबत डॉ.राहूल वेदप्रकाश पाटील, वि.स.स. यांनी दि.०४.०४.२०२२ च्या पत्रान्वये आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे व विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे तक्रार केली होती. यानुषंगाने क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने दि.०६.०४.२०२२ च्या पत्रान्वये प्राथमिक चौकशी करुन अहवाल ७ दिवसात सादर करण्याच्या सूचना जिल्हा क्रीडा अधिकारी, हिंगोली यांना दिल्या होत्या. तथापि सदर चौकशी त्यांनी केली नाही. विभागीय उपसंचालक, कार्यालय औरंगाबाद, यांच्या कार्यालयाद्वारे प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी हिंगोली व वरिष्ठ लिपिक यांना माहिती देण्यासाठी दि. २९.०७.२०२२ रोजी पत्र देण्यात आले होते. परंतू त्यांनी माहिती दि.२५.०८.२०२२ च्या पत्रान्वये दिली यावरुन जिल्हा क्रीडा अधिकारी हिंगोली व संबंधित योजना हाताळणारे कर्मचारी यांच्याकडून माहिती देण्यास टाळाटाळ झाल्याचे दिसून येते.
(२) नाही, चौकशी समितीने निधीबाबत कोणतेही निर्बंध आणलेले नाहीत.
(३) नाही, विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा यांनी चौकशी अहवाल आयुक्त क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना सादर केला आहे.
(४) बनावट संस्थाचे प्रस्ताव शिफारस करुन अनुदान मंजूर करण्यासाठी व निधी आहरित करण्यासाठी श्री.फारुकी तत्कालीन जिल्हा क्रीडा अधिकारी, हिंगोली, श्रीमती मोराळे, सेवानिवृत्त उप संचालक व श्री.आनंद सुरेकर, वरिष्ठ लिपिक हे जबाबदार असल्याचे चौकशीत दिसून आल्याने श्री. सुरेकर यांना निलंबित करण्यात आले आहे. श्रीमती मोराळे व श्री.फारुकी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली जिल्हा परिषदेतील वर्ग "एक" व "वर्ग" दोनची रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) ५३९५८ (२१-०१-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदेतील वर्ग "एक" व "वर्ग" दोनची तब्बल ६९ पदे गेल्या अनेक वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्यात यावी अशी मागणी जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांकडे वारंवार करुनही अद्यापही पदे भरण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त रिक्त पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-१२-२०२३) :** (१) हिंगोली जिल्हा परिषदे अंतर्गत गट -अ ची २३ व गट -ब ची ४५ अशी एकूण ६८ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) हिंगोली जिल्हा परिषदे अंतर्गत महाराष्ट्र विकास सेवेतील गट-अ मधील उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत), गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा(नागनाथ)/ हिंगोली/ कळमनुरी ही ४ पदे रिक्त असून गट-ब मधील सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली, गट विकास अधिकारी, मग्रारोहयो, जि. प. हिंगोली तसेच सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती,हिंगोली/सेनगांव ही ४ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून अन्य प्रशासकीय विभागातंर्गत जिल्हा परिषद, हिंगोली येथील गट-अ व गट-ब संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बांगरवाडी ते बेल्हे (ता.पुरंदर, जि.पुणे) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१०) ५४६३५ (१८-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेल्हे, राजुरी बांगरवाडी (ता.पुरंदर, जि.पुणे) परिसरात दिनांक ३१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या संततधार पावसामुळे बांगरवाडी ते बेल्हे दरम्यानचा रस्ता वाहून गेल्याने रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने अपघात होऊन मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-०१-२०२४) :** (१) व (२) बेल्हे, राजुरी बांगरवाडी, ता. जुन्नर , जि.पुणे हा रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत करण्यात आलेला असून सदर रस्त्याचा दोष दायित्व कालावधी दि.३१.०३.२०२२ रोजी समाप्त झालेला आहे.

माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्त्यावरील मोरीच्या भरावाचा काही भाग वाहून गेला होता. जिल्हा परिषद, पुणे यांच्यामार्फत सदर ठिकाणच्या भरावाची दुरुस्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर रस्ता सुस्थितीत आहे. त्यामुळे सदर रस्त्यावर अपघात होऊन मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिवसा (जि.अमरावती) येथील पुसदा ते देवरा फाजलापूर रस्त्याची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(११) ५५४३० (१८-०१-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथील पुसदा ते देवरा फाजलापूर रस्त्याचे दोन वर्षापासून काम सुरू असून अद्यापही या रस्त्यावरील रपेट आणि देवरा-फाजलापूर रस्त्याचे डांबरीकरण न केल्यामुळे नागरिकांना वाहतूकतीच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी दिनांक ९ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, पंतप्रधान ग्रामसडक योजना, अमरावती यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर रस्त्याची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे. पुसदा ते देवरा फाजलपूर हा रस्ता एकूण ०७.००कि.मी. लांबीचा असून,त्यास ३८३.२५ लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.जमीन उपलब्धता,कोव्हीड-१९ च्या पार्श्वभुमीवर लावण्यात आलेले निर्बंध,अतिवृष्टी,निधी उपलब्धता इत्यादी कारणांनी विलंब झाला आहे.त्यानुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले होते.

(२) कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो), अमरावती यांच्या कार्यालयामार्फत कंत्राटदार यांना सदर कामे तातडीने सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तथापि, त्यानंतरही संबंधित कंत्राटदार यांनी काही कामे विलंबाने सुरु केल्यामुळे, तसेच काही दिवसानंतर कामे पुन्हा मंदावल्यामुळे दि.२५.०१.२०२३ पासून शिल्लक राहिलेल्या कामाकरिता निविदा अटी व शर्तीनुसार रक्कम रुपये १,१५,०००/- प्रति आठवडा इतकी दंड आकारणी सुरु करण्यात आलेली आहे. व माहे नोव्हेंबर, २०२३ अखेर सदर काम पुर्ण करण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निफाड व येवला (जि.नाशिक) तालुक्यातील स्थगिती दिलेली कामे सुरु करणेबाबत

**(१२) ५६५३९ (२४-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड, (जि. नाशिक) तालुक्यात मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत महा.शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र.ग्रापंई-२०२०/प्र.क्र.४४/बांधकाम-४, दि. ३१/०३/२०२२ नुसार ५ ग्रामपंचायतीचे कामे मंजूर करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निफाड व येवला (जि.नाशिक) तालुक्यातील लेखाशीर्ष २५१५, १२३८ मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेतील दि. ३१ मार्च, २०२२ व दि. ६ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर असलेल्या ६८ कामांना दिलेली स्थगिती रद्द करून ही कामे सुरु करणेसाठी परवानगी मिळणेकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. २० ऑगस्ट २०२२, दि. २९ सप्टेंबर २०२२ व दि. ४ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने निफाड व येवला तालुक्यातील कामांना दिलेली स्थगिती उठविण्यात येवून उक्त कामे सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) व (३) स्व. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजने अंतर्गत मंजुर कामावरील स्थगिती ग्राम

विकास विभागाच्या दिनांक २२ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये व लेखाशीर्ष २५१५ १२३८ मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे योजने अंतर्गत मंजुर कामावरील स्थगिती ग्राम विकास विभागाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये उठविण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इसाळवाडी (ता.खालापूर, जि.रायगड) येथील रायगड जिल्हा परिषदेची शाळा सुरु करण्याबाबत

**(१३) ५७२१८ (२४-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इसाळवाडी (ता.खालापूर, जि.रायगड) येथील रायगड जिल्हा परिषदेची शाळा गेल्या वर्षभरापासून बंद असल्याने शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून पालकांना नाईलाजास्तव माणगांव, चिखले, पनवेल येथे आश्रमशाळेत शिक्षणासाठी पाठवावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इसाळवाडी येथे शाळा सुरू करण्याची मागणी गटशिक्षण अधिकारी, खालापूर यांनी पाठविलेल्या शाळेच्या प्रस्तावावर रायगड जिल्हा परिषदेकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच शाळा तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-१२-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद शाळा ईसाळवाडी ही शाळा( शुन्य पटसंख्या झाल्याने सन २०१९ मध्ये बंद करण्यात आली आहे. पालकांनी स्वमर्जीने विद्यार्थ्यांना आश्रमशाळा चिखले, ता.पनवेल येथे शिक्षणासाठी पाठविले आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

सदर बंद झालेली शाळा सुरू करण्याचा प्रस्ताव शिक्षण संचालक (प्राथमिक) संचालनालय, पुणे यांच्या कडे सादर करण्यात आला आहे. तसेच इसाळवाडी गावातील विद्यार्थी आश्रमशाळेत शिक्षण घेत असल्यामुळे शिक्षणापासून वंचित राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यात मूलभूत सोयीसुविधा पुरविण्याबाबत

**(१४) ५७८९६ (०२-०५-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोझरी, कौंडण्यपूर, नांदुरा, पिंगळाई, वरखेड (जि.अमरावती) इत्यादी ठिकाणी तसेच जिल्हयातील इतर ठिकाणी यात्रा पुण्यतिथी कार्यक्रम दरवर्षी होत असून या कार्यक्रमासाठी लाखो भाविक उपस्थित असतात परंतू येणाऱ्या भाविकांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयातील वेगवेगळया ठिकाणी होणाऱ्या महत्त्वाच्या यात्रा, पुण्यतिथी कार्यक्रमाकरिता मोबाईल टॉयलेट व्हॅनची व्यवस्था जिल्हा परिषदेमार्फत कायमस्वरूपी करण्यात यावी, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य

कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने सदरहू जिल्हयास मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही. संबधित ग्रामपंचायती व पंचायत समिती मार्फत उपस्थित भाविकांकरिता संबंधित आयोजक किंवा ग्रामपंचायतीने लिखीत मागणी केल्यानुसार पुरेशा प्रमाणात मुलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.
(२) व (३) होय, खरे आहे. जिल्हा परिषद, अमरावती यांचे मार्फत सन २०१५-१६ मध्ये दोन मोबाईल टॉयलेट युनिटची जिल्हा नियोजन समिती मार्फत खरेदी करण्यात आली होती. त्या पैकी एक युनिट नादुरुस्त असल्यामुळे एकावेळी एकच युनिट पुरविण्यात येते. एकाच वेळी जास्त ठिकाणाहून मोबाईल टॉयलेट युनिटची मागणी आल्यास प्रथम मागणी करणा-यास उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडे पुरेसा निधी उपलब्ध होताच नादुरूस्त युनिट दुरूस्त करून वापरात आणणे शक्य आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर (जि. बुलढाणा) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून बांधण्यात आलेल्या रस्ता निकृष्ठ दर्जाचा असल्याबाबत

**(१५) ५८१९८ (०३-०५-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील धरणगाव धुपेश्वर दरम्यान मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून बांधण्यात आलेल्या रस्त्यावर खड्डे पडल्याची व साईट पट्टया न भरल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्या प्रकरणी देखभाल दुरुस्तीची जबाबदारी निश्चित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन देखभाल दुरुस्ती न करणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-०१-२०२४) :** (१) व (२) होय,हे खरे आहे.
बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील धरणगाव धुपेश्वर या इजिमा मार्गावरून राष्ट्रीय महामार्ग ५३ च्या बांधकामाकरीता लागणाऱ्या साहीत्याची, निर्धारीत क्षमतेपेक्षा जादा वाहतूक केल्यामुळे रस्ता व साईड शोल्डर काही ठिकाणी क्षतीग्रस्त असल्याचे निर्दशनास आले. प्रस्तुत प्रकरणी प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग अधिकारी,अमरावती यांच्याकडे पत्र व्यवहार करून महामार्ग कंत्राटदारामार्फत उक्त दुरूस्ती केली आहे.तसेच सदर रस्ता दोष दायित्व कालावधीत अंतर्गत असून कंत्राटादारामार्फत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## लांजा तालुक्यातील कोट येथे राणी लक्ष्मीबाई यांचे स्मारक उभारणेबाबत

**(१६) ५८४६६ (२४-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचे माहेर असलेल्या लांजा तालुक्यातील कोट येथे राणी लक्ष्मीबाई यांचे स्मारक उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारक किती दिवसात उभारण्यात येणार आहे व त्यासाठी शासनाने किती निधीची तरतूद केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर स्मारक उभारण्याबाबत स्थळपाहणी करुन प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना शासनपत्र दिनांक ०७.०६.२०२३ अन्वये देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेची नाशिक जिल्ह्यातील कामे अपूर्ण असल्याबाबत

**(१७) ५८५२० (२७-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्याकरिता २०१५ ते २०२० या पहिल्या टप्पासाठी १२०२ कि.मी. २६२ कामांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत मंजुरी दिलेल्या कामांपैकी ६२ कामे अद्यापही अपूर्ण असल्याची गंभीर बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण आदिवासी भागातील रस्ते मजबूत झाले पाहिजे असा या योजनेचा उद्देश असून योजनेचा तिसरा टप्पा सुरु झाला असला तरी आजही या अनेक रस्ते अपूर्ण आहेत तर दोष दायित्व कालावधी पूर्ण झालेला नसतांनाही काही ठेकेदारांनी या मार्गावरील खड्डे भरलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तदनुषंगाने उक्त दोष दायित्व कालावधी (डी.एल.पी.) पूर्ण न झालेल्या तसेच रस्त्यांची दुरुस्ती न केलेल्या मक्तेदार एजन्सीवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-०१-२०२४) :** (१) होय,अंशतः खरे आहे.
(२) अशी बाब आढळून येत नाही.
(३) व (४) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत एकूण २६९ कामे मंजूर करण्यात आलेली आहेत.त्यापैकी २५० कामे पुर्ण असून १९ कामे प्रगतीपथावर आहेत.दरम्यान कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर लादलेल्या निर्बंधामूळे कामांना विलंब झालेला आहे.

तसेच प्रगतीप्रथावरील कामे माहे नोव्हेंबर २०२३ अखेर पुर्ण करण्याचे नियोजीत आहे.तसेच विलंब करणाऱ्या कंत्राटदारांवर दंडात्मक कार्यवाही सुरू आहे.
व दोष दायित्व कालावधी मधील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती निविदा अटी व शर्तीनुसार करण्यात येत आहे. याबाबत कंत्राटदाराकडून कसूर झाल्यास त्यांवर शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

---

## सातारा जिल्ह्यातील राजाळे, खुदबक्षी (ता.फलटण) ते निरावागज (ता.बारामती,जि.पुणे) रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१८) ५८६१३ (०२-०५-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील राजाळे, खुदबक्षी (ता.फलटण) ते निरावागज (ता.बारामती,जि.पुणे) या ३ कि.मी. रस्त्यावरील भोरे वस्ती येथील केवळ १०० ते १५० मीटर रस्त्याचे काम प्रलंबित असून रस्त्यावरील खड्डयांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्याने एसटी बसेची वाहतूक बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे नागरीकांची गैरसोय होत असल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी तहसीलदार, फलटण व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांचेकडे दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय, तसेच सातारा व पुणे जिल्ह्यांना जोडणाऱ्या येथील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन वाहतुकयोग्य सुस्थितीत ठेवण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-०१-२०२४) :** (१) व (२) सातारा जिल्ह्यातील L-२४ ते मोरेवस्ती लिफ्ट फाटा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या ट्प्पा क्र.१ मध्ये मंजुर असून त्यापैकी ०/०० ते २/४०० या साखळीतील काम पुर्ण आहे. तथापि २/५०० ते ३/००० या साखळीतील कामास ग्रामस्थांनी अडथळा आणल्यामुळे काम अपुर्ण आहे. सदरचा रस्ता हा कच्चा मातीचा असून स्थानिकांच्या मागणी विचारात घेवून तहसिलदार व पोलिस बंदोबस्तामध्ये रस्त्याचे काम पुर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**मौजा टाकळी राजापूर ते उमरखेड (जि.यवतमाळ) रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१९) ५८७६८ (२५-०४-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा टाकळी राजापूर ते उमरखेड (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) या ३ कि.मी.रस्त्याचे काम शासनाने गत वर्षी दिनांक २६ जानेवारी,२०२३ रोजीपर्यंत पूर्ण करुन उर्वरित ५ कि.मी रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन ते दिनांक २३ जानेवारी,२०२३ रोजीपर्यंत प्रलंबित रस्त्याचे काम सुरु करण्यासाठी येथील महिलांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय यांच्याकडे दिनांक १६ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊन आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०१-२०२४) :** (१) व (२) होय,हे खरे आहे,सदर रस्त्याच्या कामास मार्च २०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर कामांबाबत निविदा प्रक्रीया सुरू आहे.
(३) प्रश्नच उद्भभवत नाही.

---

**नाशिक शहरातील हिरावाडी,पंचवटी तालुका व जिल्हा नाशिक येथे आरक्षित असलेल्या भूखंडावर क्रीडा संकुल उभारणेबाबत**

**(२०) ५८९९२ (२७-०४-२०२३). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरासह नाशिक विभागातील पाच ही जिल्ह्यातील उद्योन्मुख खेळाडूंना आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार खेळाचे आधुनिक व अद्यावत मैदान व आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेच्या अनुषंगाने उपलब्ध न होणाऱ्या सुविधांमुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाच्या अनुषंगाने नाशिक शहरातील हिरावाडी,पंचवटी तालुका व जिल्हा नाशिक येथे आरक्षित असलेल्या भूखंडावर खेलो इंडिया या केंद्राच्या महत्वकांक्षी योजनेतून नवीन अद्यावत क्रीडा संकुल उभारण्यासाठी प्रधान सचिव क्रीडा व युवक कल्याण विभाग यांना लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० /९/ २०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणी प्रकरणी क्रीडा विभाग,महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ३०/९/२०२२ रोजी पत्राव्दारे आयुक्त क्रीडा व युवक सेवा,पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक यांना सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आयुक्त क्रीडा व युवक सेवा,पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी नाशिक यांनी सदरील प्रकरणी कोणतेही कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,उक्त प्रकरणी उद्योन्मुख खेळाडूंचा सर्वांगीण विकास होण्यासाठी तसेच ऑलंपिक व राष्ट्रकुल स्पर्धेच्या दृष्टीने नवीन खेळाडू निर्माण होण्यासाठी आवश्यक सर्व अद्यावत सोयी सुविधायुक्त नाशिक शहरातील हिरावाडी,पंचवटी तालुका जिल्हा नाशिक येथे आरक्षित भूखंडावर क्रीडा संकुल उभारण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (३०-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) होय,आयुक्त, क्रीडा व युवक सेवा,पुणे यांना दि.३०.९.२०२२ रोजीच्या शासनपत्रान्वये अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.
(४) व (५) हे खरे नाही.

नाशिकच्या विभागीय क्रीडा संकुलांतर्गत ४०० मी. सिंथेटीक धावनमार्ग, फुटबॉल मैदान, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल चे प्रत्येकी दोन मैदाने, टेनिस या खेळाचे दोन सिंथेटीक मैदाने, बहुउद्देशीय हॉल, दोन स्क्रॅश कोर्ट, कुस्ती, ज्युडोहॉल, अद्यावत व्यायामशाळा, १०,२५,५० मी. च्या बंदिस्त शुटींग रेंज, वस्तीगृह इमारत, प्रेक्षक गॅलरी, कॅफेटेरीया, प्रशासकीय कार्यालयीन इमारत, इ. सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत त्याचा वापर खेळाडू, मार्गदर्शक व सर्वसाधारण नागरिक यांचेकडून होत आहे.

केंद्र शासनाच्या खेलो इंडिया या महत्वाकांक्षी योजनेतर्गत विभागीय क्रीडा संकुला मधील खेलो इंडिया सेंटर मध्ये खेळाडू नियमित सराव करीत असून, त्यापैकी ०१ राष्ट्रीय व ०३ राज्यस्तरावर नैपुण्य प्राप्त केलेले आहे. विभागीय क्रीडा संकुल,नाशिक विकसित करण्यात आले असून नागरिक व खेळाडूकडून क्रीडा सुविधांचा वापर होत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायेश्वर (ता.भोर, जि.पुणे) किल्ल्यावरील महादेव मंदिर सुशोभिकरणासाठी निधी उपलब्ध्ा करुन देण्याबाबत

**(२१) ५९१७३ (३०-०४-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायेश्वर (ता.भोर, जि.पुणे) किल्ल्यावरील महादेव मंदिर सुशोभिकरणासाठी सन २०२२-२३ नाविण्यापूर्ण योजनेमधून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पालक मंत्री पुणे जिल्हा यांना दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनानुसार महादेव मंदिर सुशोभिकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२४) :** (१) होय, खरे आहे.
(२) जिल्हा नियोजन समिती, पुणे अंतर्गत उपलब्ध असलेल्या ३% राखीव निधी अंतर्गत महादेव मंदिराचे जतन/दुरुस्ती काम करण्यासाठी वास्तुविशारदाची नेमणूक करण्यात आली असून त्यानुषंगाने अंदाजपत्रक बनविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यातील कारी येथे सरदार कान्होजी जेधे यांचा पूर्णाकृती पुतळा व त्यांच्या वस्तूंचे संग्रहालय उभारणेबाबत**

**(२२) ६११४० (२४-०४-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील कारी येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे सरदार कान्होजी जेधे यांचा पूर्णाकृती पुतळा व त्यांच्या वस्तूंचे संग्रहालय उभारण्याची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिल्प व मुर्तींच्या सहाय्याने त्यांचा जीवनपट दाखविणारे शिल्पालय व शिवसृष्टी उभारण्याची देखील मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेवून उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०४-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
अध्यक्ष, राजेश्री कान्होजी नाईक जेधे देशमुख ट्रस्ट, कारी यांनी ग्रामपंचायत कार्यालयाकडे दिनांक २५.०७.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केली आहे.
(२) ग्रामपंचायत स्तरावरील विकास कामांची मागणी केली आहे.
(३) जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून शासनास अद्याप प्रस्ताव प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवत (ता.खेड) येथे जिल्हा परिषद शाळांच्या परिसरात अतिक्रमणे झाल्याबाबत**

**(२३) ६१५६१ (०२-०५-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवत (ता.खेड) येथे जिल्हा परिषद शाळांच्या परिसरात अनधिकृतपणे दुकाने टाकून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊन नागरिकांना व विद्यार्थ्यांना त्रास होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर भागातील अतिक्रमणे काढणेबाबत शासने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-१२-२०२३) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.
सदर शाळेला पक्की संरक्षक भिंत असून शाळेच्या आवारात कोणतेही अतिक्रमण झालेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नेहरुनगर कुर्ला पूर्व येथील मातृ दुग्धशाळेच्या जागेवर सर्व सोयीसुविधा युक्त क्रिडा संकुल उभारण्याबाबत

**(२४) ६१९९६ (२७-०४-२०२३). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेहरुनगर कुर्ला पूर्व येथील मातृ दुग्धशाळेच्या जागेवर अत्याधुनिक सर्व सोयीसुविधा युक्त असे क्रिडा संकुल उभारण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा क्रिडा अधिकारी यांच्याकडे वारंवार लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागा ही पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभागाच्या अखत्यारीत असल्याने सदर जागा क्रिडा विभागास हस्तांतरीत वा सामंजस्य करार होण्याच्या अनुषंगाने क्रीडा विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (३०-११-२०२३) :** (१) व (२) अशंत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालिन मा. मंत्री (क्रीडा) यांना दि.१६/३/२०२१ रोजी मुंबई पुर्व उपनगरामध्ये कोठेही क्रीडा संकुल नसल्याने अत्याधुनिक सर्व सुविधायुक्त असे क्रीडा संकुल मुंबई विकास प्राधिकरणामार्फत उभारण्याबाबत यावे अशी विनंती केली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.२४/०६/२०२१ व दि.३१.०५.२०२३ रोजी नेहरुनगर कुर्ला (पूर्व) येथील जागेवर तालुका क्रीडा संकुल विकसित करण्यासाठी सहमतीचा अभिलेख (M.O.U.) करुन देण्याबाबत पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभागाला विनंती केलेली आहे. याबाबत सबंधितांकडून अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही. सदर जागा या क्रीडा विभागास हस्तांरीत करण्यात आल्यावर क्रीडा संकुल उभारण्याबाबतची कार्यवाही करता येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) येथे बांधण्यात आलेल्या इमारतीचे लोकार्पण करण्याबाबत

**(२५) ६४६०७ (२३-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (जि. सिंधुदुर्ग) येथे पावणेतीन कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात अलेल्या पंचायत समितीच्या इमारतीचे लोकार्पण अद्यापही न झाल्यामुळे सदर इमारत विनावापर पडून असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर इमारतीचे तातडीने लोकार्पण करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही,

पंचायत समिती, वैभववाडी (जि. सिंधुदुर्ग) येथील नविन पंचायत प्रशासकीय इमारत स्थापत्यदृष्ट्या मार्च, २०२२ मध्ये पूर्ण झाली आहे. तथापि, अद्यापही इमारतीस पाणी पुरवठा, वीज इत्यादी मुलभूत सुविधा प्राप्त नसल्याने इमारत वापरात आलेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खर्डी (ता. शहापूर, जि. ठाणे) येथील क्रीडा संकुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२६) ६४६१५ (२३-०८-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी (ता.शहापूर जि.ठाणे) येथे पाच वर्षापूर्वी शासनाने क्रीडा संकुल मंजूर करण्यात आल्यानंतर सदर संकुलासाठी खर्डी येथील ग्रामीण रुग्णालयासमोरील ७ एकर शासकीय जमीन हस्तांतरीत करण्याचे आदेश तत्कालीन ठाणे जिल्हा पालक मंत्री व विद्यमान मुख्यमंत्री यांनी महसूल विभागास दिले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना महामारीच्या काळात जिल्हा क्रीडा व महसूल विभागाच्या दुर्लक्षपणामुळे हस्तांतरणाची प्रक्रिया प्रलंबित असतांना सदर जागा एका आंतरराष्ट्रीय शाळेला देण्यात आल्याचे दिनांक १९ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने क्रीडा संकुलासाठी आरक्षित असलेली जागा आंतरराष्ट्रीय शाळेला देण्याची चौकशी केली आहे काय,

(४) तसेच, खर्डी येथील मंजूर झालेले क्रीडा संकुल उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (३०-११-२०२३) :** (१) होय,

जिल्हा नियोजन समिती, ठाणे यांच्या दि.२०/८/२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये तत्कालीन मा. पालकमंत्री व विद्यमान मा. मुख्यमंत्री यांनी मौजे खर्डी, ता. शहापूर, जि.ठाणे येथील जमीन प्रस्तावित तालुका क्रीडा संकुल, शहापूरसाठी उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश दिले होते.

(२), (३) व (४) सदर संकुलासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ०२.८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे यांना मौजे खर्डी तालुका शहापूर येथील स.नं.२६१/१/१ एकूण क्षेत्र १५-२६-५३ है. आर. पैकी २-००-० हे आर. ही जमीन शहापूर तालुका क्रीडा संकुल करिता वर्ग करण्यात आली आहे. सद्यास्थिती मध्ये जागेची मोजणीचे कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार शहापूर तालुका क्रीडा संकुल उभारणीसाठी पुढील कार्यवाही करण्यात येईल. तथापि, आंतरराष्ट्रीय शाळेला देण्यात आलेली जागा ही उक्त जागेशी संबंधित नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बाभळगाव ते बोरी रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२७) ६४९६३ (३०-०८-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभळगाव ते बोरी (ता.जि.लातूर) रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे सदर रस्त्यावर अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) लातूर तालूक्यातील बाभळगाव ते राज्यमार्ग १४५ रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.१३७ दर्जाचा असून सदर रस्त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्याची संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची असून नादुरुस्त आहे. यास्तव सदर रस्त्याचे काम रस्ते व पूल दुरुस्तीच्या विविध योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीमधून घेण्याच्या सूचना जिल्हा परिषदेस देण्यात आलेल्या आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसार (जि. रायगड) येथील कर्जत-काटई रस्त्याकरिता जमिन संपादन करताना चुकीची नोंद केल्याबाबत**

**(२८) ६५०३३ (३१-०८-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि. रायगड) येथील कर्जत-काटई राज्य महामार्गाची एक मार्गिका एका शेतकऱ्याने बंद केली असल्याने एम.आय.डी.सी. प्रशासनाने सदर रस्ता बंद केल्याचे जाहीर केल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबरनाथ मधून जाणाऱ्या कर्जत-काटई राज्य महामार्गासाठी वासार गावातील शेतकऱ्याची जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सन १९७२ साली संपादित केली असून सदर जमीन कागदोपत्री नोंद करताना ताब्यात घेतलेल्या जमिनी ऐवजी रस्त्याच्या बाजूच्या जमिनीवर फेरफराची नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रस्ता असलेली जमिन व बाजूच्या जमिनीवर एम.आय.डी.सी.ने चुकीची नोंद केल्यामुळे संबंधित शेतकऱ्याला त्याच्या जमिनीचा वापर करता येत नसल्याने याबाबत मागील ५० वर्षे एम.आय.डी.सी. प्रशासनाला वारंवार तक्रार देऊनही सदर प्रशासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन ज्या शेतकऱ्यांच्या जागेवर चुकीची नोंद केली त्या शेतकऱ्यांच्या मागणीकडे व तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या एम.आय.डी.सी. च्या संबंधित अधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाई करुन एम.आय.डी.सी. ने केलेली चुकीची नोंद काढून टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (११-०१-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
मौजे वसार, ता.अंबरनाथ येथील सर्व्हे नं. ५ हिस्सा नं. ६ क्षेत्र ०.३४.० हे.आर जमीन रस्ता व जलवाहिनीसाठी भूसंपादन सन १९७३ साली विशेष भूसंपादन अधिकारी उल्हासखोरे प्रकल्प यांचे मार्फत संपादन होऊन तिचा ताबा मऔवि महामंडळास दिलेला आहे. त्या रस्त्यामध्ये संपादित क्षेत्रासंबंधित शेतकरी श्री. लहू तुकाराम वायले व त्यांचे कुटूंबियांनी सुमारे एप्रिल २०२३ च्या दरम्यान अडथळा निर्माण केल्याचे निदर्शनास आले होते. परंतु एमआयडीसीने सदर रस्ता बंद केल्याचे जाहिर केले नाही.
(२) व (३) हे खरे नाही.
रस्ता व पाईप लाईन असलेली जमीन ही एमआयडीसीसाठी सन १९७३ साली संपादीत झाली असून सदर क्षेत्राचे सर्व्हे नं. ५/६ क्षेत्र ०.३४.० हे आर च्या ७/१२ वर मऔवि महामंडळाच्या नावाची महसूल विभागाने नोंद केली आहे.
सद्यस्थितीत जलवाहिनी व सेवारस्ता या करीता वापरात असलेले ०.२३.२८ हे.आर क्षेत्राव्यतिरिक्त उर्वरित ०.१०.७२ हे.आर क्षेत्र संबंधित शेतकरी यांच्या ताब्यात असून, ते त्या क्षेत्राचा वापर करीत आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारेगांव (ता.धर्माबाद, जि.नांदेड) येथील नागरिकांनी स्मशानभूमी मागणी केल्याबाबत**

**(२९) ६५३३१ (२३-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारेगांव (ता.धर्माबाद, जि.नांदेड) येथील स्मशानभूमीच्या मागण्या मान्य केल्या परंतू अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामुहीक आत्मदहनाचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भागातील नागरिकांनी मागील अनेक वर्षापासून स्मशानभूमीची मागणी केली असतानाही नव्याने धर्माबाद तहसिलदार महोदयांना दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन देण्यात आले व उपोषणही करण्यात आले परंतू अद्यापी कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याने नागरिकांनी दिनांक ८ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहनाचा इशारा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मागणीची चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त स्मशासनभूमींची मागणी त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-१२-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत तहसिलदार व गट विकास अधिकारी, धर्माबाद यांनी संयुक्त चौकशी केली आहे. तसेच, ग्रामपंचायत कारेगाव यांनी स्मशानभूमी पर्यंत जाण्यासाठी सी.सी. रस्ता व इतर सुविधा मंजूर करण्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांना दि.३०.०८.२०२३ रोजी प्रस्ताव सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्ते पूर्ण करण्याबाबत**

**(३०) ६६१५७ (२३-०८-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील १० हजार किलोमीटर लांबीच्या ग्रामीण रस्त्यांना ७,५०० कोटी रुपयांची मंजुरी दिली आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामांसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे, तसेच अनेक ठिकाणची कामे ही संथगतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर जिल्हयातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्ते तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-०१-२०२४) :** (१),(२), व (३) हे खरे नाही, औरंगाबाद जिल्हयातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत टप्पा १ व २ मध्ये एकूण ६५०.०० कोटी किंमतीच्या २५१ कामांना मंजुरी देण्यात आली आहे.त्यापैकी

टप्पा १ मधील २०७ कामांपैकी ११७ कामे पुर्ण झाली असून ९० कामे प्रगतीपथावर आहेत व सदरहू कामे माहे मार्च, २०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजित आहे तसेच टप्पा क्र.२ मधील ४४ कामे निविदास्तरावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोफरण ( जि. पालघर ) येथील जिल्हा परिषद शाळेच्या इमारत दुरुस्तीसाठी निधी मंजूर करण्याबाबत**

**(३१) ६६५३४ (२३-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोफरण (जि. पालघर) येथील तारापूर अणूऊर्जा प्रकल्प ३ व ४ च्या उभारणीसाठी गावातील शेतजमीन व घरे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या मुलांसाठी न्युक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (एनसीपीआयएल) च्या सामाजिक दायित्व निधीतून उभारण्यात आलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या एकूण सहा वर्गखोल्यामध्ये विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या पाच शाळेच्या वर्गखोल्यांची अत्यंत दुरवस्था झाली असून शाळेतील वर्गखोल्यांच्या तुटलेल्या, उखडलेल्या फरशांमधून जमिनीत साप-विंचवांचा वावर होत असनूही सदर प्रकल्पग्रस्त विद्यार्थी भीती पोटी शिक्षण घेत आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी मुख्याधिकारी (जिल्हा परिषद पालघर), शिक्षणाधिकारी (जि. पालघर) अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे स्थानिक प्रतिनिधी तसेच `समर्थन' संस्थेने दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीस तात्काळ निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-१२-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) जिल्हा परिषद शाळा, पोफरण या शाळेतील एका वर्गखोलीची लादी जमीनीत दाबल्याने जमीनीला खोलवर तडा गेलेला असून बाहेरील स्लॅबचे प्लास्टर व स्लॅब फुटलेला असल्याने सदर शाळा दुरुस्ती करुन मिळण्याबाबत संबंधित शाळेने अर्ज सादर केला होता. त्यानुसार सन २०२२-२३ च्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) या आराखडयात सदर शाळेच्या दुरुस्ती कामासाठी रु.१०.०० लक्ष मंजूर करण्यात आले व काम पूर्ण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भानकवाडी (ता. शिरुर, जि. बीड) येथे नळकांडी पुलाचे बांधकाम करणेबाबत**

**(३२) ६६९४३ (२३-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भानकवाडी (ता. शिरुर (का.) जि.बीड) येथील लगतच्या परिसरात दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टी व परतीच्या पावसामुळे तेथील नदी नाल्यांना पूर आल्याने तेथील परिस्थिती धोकादायक बनली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भानकवाडी ते साळुंखेवस्ती या रस्त्यावरील नळकांडी पूल नसल्याने तीन बालकांचा पुराचे पाण्यामध्ये बुडून दुर्देवी मृत्यू झाल्याची दुर्घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे होणाऱ्या दुर्घटना टाळण्याच्यादृष्टीने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून वा आपत्ती निवारण निधीच्या माध्यमातून, "ग्रा.मा.३६ भानकवाडी ते साळुंकेवस्ती रस्त्यावर कि.मी ०/२५० मध्ये नवीन नळकांडी पूल बांधण्यात यावा," अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी तसेच मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. सहकार मंत्री तसेच मा. जिल्हा पालक मंत्री, बीड जिल्हा यांना पत्र-निवेदन देऊन केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) भानकवाडी ते साळुंखेवस्ती रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.३६ दर्जाचा असून सदर रस्त्याच्या सा.क्र.०/२५० मध्ये मोठा ओढा आहे. सदर ठिकाणी नवीन नळकांडी पूलाचे बांधकाम करणे आवश्यक असून सदर नळकांडी पूलाचे काम जिल्हा परिषदेमार्फत सन २०२३-२४ आपत्ती सौम्यीकरण योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

### चिखली (जि.बुलढाणा) येथील बॅडमिंटन हॉल आणि इतर कामे करताना अनियमिता झाल्याबाबत

**(३३) ६७३८३ (२३-०८-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि.बुलढाणा) येथील क्रीडा संकुल बॅडमिंटन हॉलचे काम करण्यात आले असून सदर हॉलचे बांधकाम बॅडमिंटन हॉलसाठी लागणाऱ्या निकषानुसार केली नसल्याने तसेच इतर ही कामे न करता बिले काढली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्याकडे लेखी स्वरूपात केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी दोन सदस्यीय समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर संबंधीत दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (३०-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) होय.
(४) चौकशी समितीचा अहवाल प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुरडे (ता. खेड,जि.रत्नागिरी) येथे भारतरत्न पांडुरंग वामन काणे यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(३४) ६७५०७ (२३-०८-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतरत्न पांडुरंग वामन काणे यांचे मूळ गाव असलेल्या मुरडे या गावी अद्याप पर्यंत त्यांचे स्मारक उभारण्यात आले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्या गावी त्यांच्या स्मृती जतन करण्याच्या दृष्टीने अद्याप पर्यंत कोणतीच कार्यवाही न केल्याची नेमकी काय कारणे आहेत,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त स्मारक उभारण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली तसेच स्मारकाचे काम केव्हापर्यंत करण्यात येईल

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१७-०१-२०२४) :** (१), (२) व (३) मुरडे, ता. खेड, जि.रत्नागिरी येथे भारतरत्न पांडुरंग वामन काणे यांचे जुने घर असून, त्याठिकाणी त्यांचे स्मारक उभारण्याबाबत ग्रामसभेने ठराव केलेला नाही. तसेच ग्रामपंचायत व पंचायत समितीकडे स्मारक उभारण्याबाबत कोणाकडूनही मागणी/निवेदन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे स्मारक उभारणीबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर जिल्ह्यास सन २०२१-२२ या वर्षात मिळालेला निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(३५) ६७६४६ (२३-०८-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील २०२१-२२ मधील सर्व मंजूर निधी खर्च करण्यात अपयश येत असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्हा परिषदेवर प्रशासक असून ही संपूर्ण निधी खर्च न झाल्याने किमान ३० टक्के निधी परत गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर जिल्हा परिषदेला मिळालेला निधी वेळेत खर्च न झाल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-१२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सन २०२१-२२ मध्ये जिल्हा वार्षिक योजनांतर्गत सोलापूर जिल्हा परिषदेला रक्कम रु.२७२२९.३० लक्ष निधी प्राप्त झाला होता. सदर रु.२७२२९.३० लक्ष निधी पैकी सन २०२१-२२ मध्ये रु.५१८८.४२ लक्ष व सन २०२२-२३ मध्ये रु.२०८६२.१४ लक्ष असा एकूण रु.२६०४८.७६ लक्ष म्हणजेच एकूण प्राप्त अनुदानाच्या ९५.६६% एवढा निधी एवढा निधी माहे मार्च, २०२३ पर्यंत खर्च झालेला आहे.

तसेच सन २०२१-२२ मध्ये शासन निधी अंतर्गत जिल्हा परिषदेस रक्कम रु.३६९२.२२ लक्ष निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी माहे मार्च, २०२३ पर्यंत रु.३३४१.९७ लक्ष (म्हणजेच ९०.५१ %) इतका खर्च होवून रु.३५०.२५ लक्ष निधी अखर्चित राहिलेला आहे.
(३) व (४) जिल्हा परिषदेला मिळालेला निधी विहीत वेळेत खर्च करण्यात आलेला असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदगांव पेठ (ता.तिवसा,जि.अमरावती) एमआयडीसी मध्ये प्रकल्पग्रस्त कुटूंबातील युवकांना रोजगार मिळयाबाबत

**(३६) ६८०५२ (२८-०८-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगांव पेठ (ता.तिवसा,जि.अमरावती) एमआयडीसीमध्ये प्रकल्पग्रस्तांची शेती गेली असून अद्यापही त्यांचे कुटुंबातील युवकांना रोजगार मिळाला नसल्याचे माहे जून, २०२३ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कुटुंबातील युवकांना रोजगार नसल्याने त्यांची कौटुंबिक स्थिती हलाखीची झाली असल्याने १० प्रकल्पग्रस्तांचे कुटुंबातील व्यक्तींना रतन इंडिया प्रा.लि.नांदगांव पेठ येथे रोजगार मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१७-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) मे.रतन इंडिया प्रा.लि.यांना त्यांच्या कंपनीच्या भरती नियमानुसार व भूपिडीत युवकाच्या पात्रतेनुसार नोकरीत समाविष्ट करुन भरतीची उचित कार्यवाही करणेबाबत मऔवि महामंडळामार्फत दि.२५.०९.२०२३ रोजी कळविण्यात आले आहे. तथापि, कंपनीने आज अखेर २११४ रोजगार निर्मिती केली असून, त्यामध्ये १७६५ स्थानिक रोजगार निर्माण केला आहे. सदर स्थानिक रोजगारापैकी १७८ भूपिडीतांना रोजगार दिला असून, १९ भूपिडीतांचे अर्ज प्रलंबित आहेत.

सदर प्रलंबित अर्जांवर भविष्यात पदे निर्मिती किंवा पदे रिक्त झाल्यास विचार केला जाईल असे कंपनीने आश्वासन दिलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रधानमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांना वेतनवाढ देण्याबाबत

**(३७) ६८२२१ (२३-०८-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास योजनेअंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांना गत १२ वर्षापासून वेतनवाढ देण्यात आलेली नसून सदरील कामासाठी बाह्य यंत्रणेमार्फत नियुक्त कर्मचाऱ्यांना तीन पटीने अधिक वेतन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कंत्राटी कर्मचारी यांच्यावर अन्याय व दुजाभाव होत असल्याने उक्त कर्मचारी यांना वेतनवाढ देण्याबाबत माहे एप्रिल-मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर कंत्राटी कर्मचारी यांना वेतनवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या संबंधित कर्मचाऱ्यांनी शासनाच्या विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई तसेच खंडपीठ औरंगाबाद व नागपूर येथे दाखल केलेल्या सर्व रिट याचिका मागे घेण्याच्या अटींस अधीन राहून, दि.३१.०७.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.०१.०७.२०१८ पासून सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या दरमहा एकत्रित वेतनात (मानधन) सुधारणा करण्यात आली आहे. तथापि, कंत्राटी कर्मचाऱ्यांनी मा.न्यायालयात दाखल केलेल्या याचिका मागे न घेतल्याने सदर एकत्रित वेतनवाढ (मानधन) वाढ लागू करण्यात आलेली नाही.

तद्नंतर, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला असता, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना बाह्ययंत्रणेमध्ये रुपांतरीत केल्यानंतर त्यांना बाह्ययंत्रणा धोरणानुसार अनुज्ञेय मानधन लागू करणे उचित राहील, असे अभिप्राय वित्त विभागाने दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड तालुक्यातील ३० रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांना मंजूरी देऊन निधी देण्याबाबत

**(३८) ६८५६३ (२५-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड तालुक्यातील ६३ रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याने येथील नागरीकांना,विद्यार्थी, रुग्ण, जेष्ठ नागरीक इत्यादींना अडचणींना सामोरे जावे लागत असल्यामुळे या रस्त्यांच्या कामांना मंजूरी देऊन त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी संबंधित लोकप्रतिनिधीनी पत्राद्वारे दिनांक १४ जून,२०२३ रोजी मा. ग्रामविकास मंत्री यांना विनंती केली

आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामाची पाहणी करण्यात आली आहे काय व त्यानुसार किती रस्त्यांची कामे सुरु करण्यात आली व त्यासाठी किती निधी मंजूर करण्यात आलेला आहे,

(३) असल्यास, उक्त रस्त्यांच्या कामांना त्वरीत मंजूरी देऊन कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर ६३ रस्त्यांपैकी १३ रस्त्यांच्या एकूण १२.६० कि.मी. लांबीसाठी व ३ पुलांच्या दुरुस्तीसाठी एकूण रु.२९८.५ लक्ष निधी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजूर करण्यात आला आहे.

तसेच उर्वरित नादुरुस्त लांबीच्या दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेस रस्ते व पूल दुरुस्ती अंतर्गत विविध योजनेमधून प्राप्त होणाऱ्या निधीमधून घेण्याचे नियोजन करण्याबाबत जिल्हा परिषदेस सूचना देण्यात आलेल्या आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यातील निवासी अतिक्रमण नियमानुकूल करणेबाबत

**(३९) ६८५९५ (२३-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील सर्वांसाठी घर २०२२ या धोरणाअंतर्गत ग्रामीण भागातील १३ हजार २५२ निवासी अतिक्रमणाच्या नोंदी जिल्हा परिषदकडे प्राप्त झाल्या असून त्यापैकी फक्त ६ हजार ४५ निवासी अतिक्रमण नियमानकुल करण्यात आले असल्याचे दिनांक १४ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, गेल्या दोन वर्षांपासून संकेतस्थळच बंद असल्याने उर्वरित अतिक्रमणे नियमानुकूल झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त जिल्हयातील निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०४-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दिनांक १६.०२.२०१८ च्या शासन निर्णयानुसार धुळे जिल्ह्यामध्ये एकुण १३७३५ इतक्या अतिक्रमण धारकांची नोंद संगणक प्रणालीमध्ये करण्यात आली. त्यापैकी गावठाण क्षेत्रातील १३२५२ व महसुल व इतर विभागाच्या जागेवरील ४८३ अतिक्रमणे आहेत. गावठाण क्षेत्रातील १३२५२ एवढ्या अतिक्रमण नोंदीपैकी ६०४५ एवढी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यास मंजुरी दिलेली आहे. त्यापैकी, निशुल्क असलेली २०९६ पैकी २०९६ नियमानुकूल करण्याची प्रमाणपत्रे संबधित अतिक्रमण धारकांना वाटप करण्यात आलेली आहेत. तसेच सशुल्क असलेली ३९४९ पैकी १२६८ अतिक्रमण धारकांची रेडी रेकनर दराने ग्रामसेवक लॉगीन ला माहिती भरण्यात आलेली असून, उर्वरित अतिक्रमण धारकांची माहिती भरण्याचे काम सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील रेल येथील स्वयंभू रेल्वेश्वर महादेव मंदिर तसेच तेथील आदिवासी परंपरा बाबत नोंदी व या संस्थांनाला तीर्थ स्थळाचा दर्जा देऊन निधी मंजूर करण्याबाबत

**(४०) ६८६०३ (२५-०८-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील रेल येथील स्वयंभू रेल्वेश्वर महादेव मंदिर अतिशय प्राचीन असून सदरहू ठिकाणी प्रत्येक वर्षी महादेवाचा लग्न सोहळा यात्रा महोत्सव साजरा होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी तेथील आदिवासी परंपरा बाबत नोंदी व या संस्थांनाल तीर्थ स्थळाचा दर्जा देऊन निधी मंजूर करण्यासंदर्भात उमेश महादेवराव ढोणे, आदिवासी कोळी महादेव समाजाचे पदाधिकारी यांचे प्राप्त निवेदनावरून लोकप्रतिनिधी यांनी वरील मागणीचे पत्र ग्रामविकास मंत्री यांना पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्ररणाबाबत जिल्हाधिकारी अमरावती त्यांनी त्यांच्यामार्फत त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक.५९७/२०२३दि.११/०५/२०२३,रोजी ग्रामविकास मंत्री यांना पाठवून नमूद केल्याप्रमाणे शासन स्तरावर मान्यता मिळावी यासाठी प्राप्त झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने अकोला जिल्ह्यातील रेल येथील स्वयंभू रेल्वेश्वर महादेव मंदिर तसेच तेथील आदिवासी परंपरा बाबत नोंदी व या संस्थांनाला तीर्थ स्थळाचा दर्जा देऊन निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२४) :** (१) व (२) होय, खरे आहे.

(३) प्रश्नात नमूद पत्राचा शोध घेतला असता पत्र आढळून आले नाही. तथापि, उपायुक्त (विकास) अमरावती विभाग यांचे या अनुषंगाने दि.१२.०६.२०२३ रोजीचे पत्र प्राप्त आहे.

(४) “क” वर्ग तीर्थक्षेत्रांचा दर्जा जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने दिला जातो. त्यामुळे जिल्हा परिषद, अकोला यांनी दि.०९.०८.२०२३ पत्रान्वये “क” वर्ग दर्जा मिळण्याकरिता प्रस्तावातील त्रुटीची पूर्तता करुन प्रस्ताव फेर सादर करण्याबाबत गट विकास अधिकारी, पं.स., अकोट यांना कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जे.एम.बक्षी पोर्ट उरण येथे भूमिपुत्रांना नोकरीत सामावून घेणेबाबत

**(४१) ६८६२५ (२३-०८-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई जवळील उरणच्या जवाहरलाल नेहरु बंदरात कंटेनर टर्मिनलच्या खाजगीकरणातून सुरु केलेल्या जे.एम.बक्षी पोर्टमध्ये उरणधीमल स्थानिक मराठी भूमिपुत्रांना डावलून क्रेन दुरुस्ती विभागात सुमारे २५ परप्रांतीय कामगारांची परस्पर भरती केल्याने सदरहू भरती त्वरीत न थांबविल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिनांक ०९ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास स्थानिक प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी शासनास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर भरतीमध्ये कामगार आयुक्तांनी हस्तक्षेप करुन उरणच्या स्थानिक प्रकल्पग्रस्त भूमीपुत्रांना प्राधान्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०१-२०२४) :** (१) अशा स्वरूपाचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) जे.एम.बक्षी पोर्ट, उरण हे घटक न्हावा शेवा फ्रीपोर्ट टर्मिनल प्रा.लि.हि पोर्ट ऑपरेशनमध्ये कार्यरत आहे. घटकाने

सादर केलेल्या पत्रानुसार घटकात एकून ५६७ कर्मचारी कार्यरत असून त्यातील स्थानिक व्यक्तींची संख्या ४९९ असून एकूण स्थानिक व्यक्तींची टक्केवारी ८८ टक्के इतकी असल्याचे कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दौंड (जि. पुणे) तालुका क्रीडा संकुलासाठी उर्वरित निधी मिळण्याबाबत

**(४२) ६८७३५ (२३-०८-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड तालुका क्रीडा संकुलासाठी शासन निर्णय दिनांक १४ ऑगस्ट,२०१९ अन्वये शासनाने तालुका क्रीडा संकुलाकरिता सुमारे ३.२० हेक्टर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त क्रीडा संकुलाच्या सुमारे ८.०० कोटी रु.च्या बांधकाम अंदाजपत्रक व आराखडयास दिनांक ११ जून, २०२० च्या पत्रान्वये तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २० जानेवारी,२०२३ रोजी ५० लाख रू. व त्यानंतर दिनांक ३१ मार्च,२०२३ रोजी ५० लाख अदा केले, असे एकूण १ कोटी रु. क्रीडा संकुलांच्या बांधकामाकरिता अनुदान प्राप्त झाले असून उर्वरित सुमारे ७ कोटी रुपये अनुदान येणे अद्याप बाकी आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त अनुदान मिळण्याबाबत मा. लोकप्रतिनिधी यांनी माहे मे - जून २०२३ मध्ये मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर अनुदान वितरीत करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (३०-११-२०२३) :** (१) होय,
(२) होय,
(३) व (४) अशंत: खरे आहे.
दि.०४.०२.२०२० रोजीच्या राज्य क्रीडा विकास समितीच्या बैठकीत दौंड (जि. पुणे) तालुका क्रीडा संकुलांच्या रु.८००.०० लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रक व आराखड्यांना शासन देय अनुदाना-व्यतिरिक्त लागणारा अतिरिक्त निधी संकुल समितीने स्वबळावर उभारण्याच्या अटीवर प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. शासन निर्णय दि.२३.०३.२०२२ अनूसार सदर संकुलाकरिता रु. ५००.०० लक्ष अनुदान अनुज्ञेय आहे. त्यानुसार सदर संकुलाकरिता अद्यापपर्यंत एकुण रु.२००.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. निधी उपलब्धेनुसार उर्वरित अनुज्ञये निधी वितरीत करण्याची तजविज ठेवली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कळंब (जि यवतमाळ) शहरातील व ग्रामीण भागातील क्रीडा संकुलाचे काम सुरू करण्याबाबत

**(४३) ६८८४५ (२३-०८-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंब (जि यवतमाळ) शहरातील व ग्रामीण भागातील विदयार्थ्यांच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा म्हणून क्रिडांगण विकास योजने अंतर्गत सन २०१२ ते २०१३ मध्ये कळंब येथे क्रीडा संकुल मंजुर करण्यात आले होते परंतू अद्याप पर्यंत मंजुर क्रीडा संकुलाचे बांधकाम करण्यात आले नसल्याचे माहे २० जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत विभागाच्या अधिकारी यांनी क्रीडा संकूल बांधकाम करण्यासाठी सन २०१५ मध्ये एका

जागेची निवड केली होती परंतू त्या जागेवर संरक्षण भिंत बांधण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०४-०१-२०२४) :** (१) होय,
(२),(३) व (४) महसूल विभागाकडून तालुका क्रीडा संकुल, कळंब करीता गट क्र. ६२६ व गट क्र.६२८ मधील जागा क्रीडा विभागाच्या नावे करण्याची कार्यवाही करीत असतांना सदर जागा खाजगी मालकीची असल्याचे तहसिलदार, कळंब यांनी दि.१५/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा क्रीड़ा अधिकारी कार्यालय, यवतमाळ यांना कळविल्याने असल्याने क्रीडा संकुलाचे बांधकाम थांबविण्यात आले आहे. तसेच क्रीडा संकूल समितीच्या ठरावानुसार चौकशी समिती गठीत केली असून, चौकशी अहवाल अद्यापही अप्राप्त आहे. तथापि, तालुका क्रीडा संकुलाकरीता पर्यायी जागेचा शोध घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत उमेद महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटनेच्या विविध मागण्या प्रलंबित असल्याबाबत

**(४४) ६८९८१ (२५-०८-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत उमेद महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटनेच्या विविध स्वरूपातील मागण्या शासनाकडे प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उमेदच्या महिलांना देण्यात येणारे मानधन अत्यंत तुटपुंजे असल्याने महागाईच्या काळात मुला बाळांचे शिक्षण तसेच वैद्यकीय गराजांसाठी पैसा कोठून आणायचा असा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने महिला या नैराश्यग्रस्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत गावपातळीवर वंचित घटकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात मोलाचे योगदान देणाऱ्या कॅडर कर्मचाऱ्यांकडून किमान २४ हजार रुपये वेतन मिळावे, बँक सखी व कृषी सखी यांना प्रवास भत्ता देण्यात यावा, मोबाईल रिचार्ज, ड्रेसकोड व ओळखपत्र मिळावे इत्यादी विविध मागण्यांसाठी नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर पंचायत समितीसमोर दि. १२ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास आंदोलन पुकारण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने उक्त कर्मचाऱ्यांना किमान १० हजार रुपये मानधन वाढ तसेच प्रवास खर्च आणि मोबाईल रिचार्ज खर्चाची तरतूद करण्यासह प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांबाबतची पूर्तता करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) संभाजीनगर येथील दिनांक १६.०९.२०२३ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कार्यरत समुदाय संसाधन व्यक्तीं (CRP, ICRP, बँक सखी, कृषी सखी, पशू सखी इत्यादी) यांचे मानधन वाढीबाबत निर्णय घेण्यात आलेला असून दिनांक २६.०९.२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(३) हे खरे आहे.
(४) संभाजीनगर येथील दिनांक १६.०९.२०२३ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कार्यरत समुदाय संसाधन व्यक्तीं (CRP, ICRP, बँक सखी, कृषी सखी, पशू सखी इत्यादी) यांचे मानधन

वाढीबाबत निर्णय घेण्यात आलेला असून दिनांक २६.०९.२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पवनी (जि. भंडारा) येथे क्रीडा संकुलात भौतिक सोयी सुविधा पुरविण्याबाबत**

**(४५) ६९११२ (२३-०८-२०२३). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवनी (जि. भंडारा) येथे तालुकापातळीवर ग्रामीण भागातील मुलांची क्रीडा क्षेत्रात प्रगती व्हावी यासाठी क्रीडा संकुलाची उभारणी करण्यात आली परंतू याठिकाणी भौतिक सुविधांचा अभाव असल्याने शासनाचा कोटयवधी रुपयांच्या निधीचा अपव्यय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्रीडा संकुलात ग्रिन जीम चे साहीत्य बसविण्यात आले परंतू तेथे काँक्रेटीकरण केले नसल्याने पोलीस भरती, सैनिकी भरती साठी सराव करणाऱ्यांना व्यायामापासून वंचीत रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, प्रशासनाच्या अनागोंदी कारभारामुळे तालुकास्तरावरील क्रीडा संकुलाची दुर्दशा झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त तालुका क्रीडा संकुलात भौतिक सोयी-सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (३०-११-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

संकुलामध्ये बॅडमिंटन हॉल, २०० मी धावनपथ, आवारभिंत, विद्युतीकरण, बॉस्केटबॉल मैदान इ. क्रीडा सुविधा पुर्ण असुन वापर सुरु आहे. सदर संकुलात जिल्हा वार्षिक योजनातून पाण्याची व्यवस्था पुर्ण झाली आहे. तसेच प्रसाधनगृह बांधकाम, व्यायाम शाळा, व्यायाम साहित्य, क्रीडांगण सपाटीकरण इ. बाबी/मंजूर असून कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

तालुका क्रीडा संकुल, पवनी (जिल्हा भंडारा) च्या एकूण रु.३९९.३८ लक्षच्या सुधारित अदांजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गंगेश्वर शिव मंदिर वरसुंगे वेळूक (ता. मुरबाड, जि.ठाणे) येथे देवस्थानला येणाऱ्या नागरिकांना प्राथमिक सोयी सुविधा उपलब्धकरुन देणेबाबत**

**(४६) ६९८७४ (२६-०९-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाई नदीच्या तीरावरील गंगेश्वर शिव मंदिर वरसुंगे वेळूक (ता. मुरबाड, जि.ठाणे) येथे देवस्थानला येणाऱ्या नागरिकांना प्राथमिक सोयी सुविधा मिळत नसून त्यामुळे नागरिकांची व भक्तांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, तीर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत इतिहासकालीन दगडी प्रवेशद्वार संरक्षण भिंत व सोयी सुविधा देण्याचा प्रस्ताव गत एक वर्षापासून शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरेआहे काय,
(३) असल्यास , उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन देवस्थानला येणाऱ्या नागरिकांना प्राथमिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१७-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) ग्रामविकास विभागाच्या दि.१६.११.२०१२ रोजीच्या शासननिर्णयातील अटी व शर्तीनुसार "अ" वर्गातील तीर्थक्षेत्रे केंद्रशासनाकडून विकसित करण्यात येतात. "ब" वर्ग तीर्थक्षेत्र यांना दर्जा व निधी राज्यशासनाकडून दिला जातो. "क" वर्ग तीर्थक्षेत्रांना दर्जा व निधी जिल्हास्तरावर जिल्हा नियोजन व विकास मंडळाद्वारे दिला जातो.

सदर ठिकाणाला "क" वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा देण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे प्राप्त नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या विविध विभागात तक्रारींचे अर्ज कार्यवाहीविना पडून असल्याने नागरीकांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४७) ७०५०० (२५-०८-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मंत्रालयातील कामाचा प्रसिद्ध करण्यात आलेल्या मासिक अहवालाद्वारे ग्रामविकास विभागाकडे गेल्या वर्षभरात दाखल करण्यात आलेल्या सुमारे ४ हजार १९७ तक्रारींचा निपटारा अद्याप करण्यात आला नसल्याची माहिती दिनांक १४ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कानाकोपऱ्यातून प्रशासकीय कामे करण्यासाठी वेळ व पैसे खर्च करुन आलेल्या नागरीकांच्या विभाग निहाय एकूण किती तक्रारी करण्यात आल्या आहेत व यापैकी किती तक्रारींचा निपटारा झाला आहे तसेच उर्वरित तक्रारींचा निपटारा निश्चित किती कालावधीत शासनाकडून करणे अपेक्षित आहे.

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त तक्रारींचे निराकरण निश्चित कालावधीत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१८-०१-२०२४) :** (१),(२) व (३) विभागाकडे एकूण ४१९७ तक्रारी प्रलंबित होत्या. सदर तक्रारींचा निपटारा करण्यात आला असून पी.जी.पोर्टलवर आता फक्त ३१२ तक्रारी प्रलंबित आहेत. सदर तक्रारींचा निपटारा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**दापूरमाळ (ता.शहापूर,जि.ठाणे) येथील वस्त्यांना दळणवळणासाठी रस्ता नसल्याने गैरसोय होत असल्याबाबत**

**(४८) ७०६८२ (०३-०९-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापूरमाळ (ता.शहापूर, जि. ठाणे) येथील खोरगडवाडी आणि ठाकूरपाडा वस्त्यांना दळणवळणासाठी रस्ता नसल्यामुळे पारधी समाजाच्या एका आजारी महिलेला उपचारासाठी तिच्या कुटुंबाने बांबूच्या झोळीतून ६ किमीची डोंगर पायवाटेवरुन रुग्णालयात भरती केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात आजही येथील नागरिकांना पावसाळयात मलेरिया, टायफॉईड इ. आजारांसह सर्प आणि विंचूदंश झाल्यास उपचारासाठी तातडीने दवाखान्यात चांगल्या रस्त्यांअभावी भरती करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उपरोक्त वस्त्यांमध्ये तातडीने रस्ते व इतर सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०१-२०२४) :** (१),(२ ) व (३) हे अंशत: खरे आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ ही योजना दि. ६ जानेवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग रस्ते दर्जोन्नतीसाठी १०,००० कि.मी . इतक्या लांबीचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. सदर उद्दिष्टापैकी नियमित ७००० कि.मी. लांबीचे रस्ते जिल्हानिहाय वाटप करण्यात आलेले आहे व ३०% लांबी संशोधन व विकास अंतर्गत मंजुर करण्यात आली आहे. त्यानुसार ३०% म्हणजेच ३,००० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास शासनस्तरावरुन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. प्रश्नाधीन रस्त्यांबाबत नियमित उद्दिष्टांतर्गत तसेच संशोधन व विकास अंतर्गत निवडीकरीता प्रचलित धोरण,उपलब्ध निधी व प्राथम्यक्रमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी फिरते शौचालय पुरवठादार ठेकेदारांवर कारवाई करणेबाबत

**(४९) ७०८०३ (२५-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेमार्फत पालखी सोहळ्यासाठी वारकरी आणि भाविकांच्या सोयीसाठी आषाढी वारीत फिरत्या शौचालयाचे नियोजन करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी फिरते शौचालय पुरवणाऱ्या ठेकेदाराने अटी व शर्ती मध्ये नमूद केल्याप्रमाणे दररोज एक हजार फिरते शौचालय नियोजित वेळेत पुरविले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर फिरते शौचालय पुरवणाऱ्या ठेकेदाराने देहू पालखी मुक्कामी ७ व ८ जून, २०२३ दरम्यान शौचालय उभारल्याने देहू ग्रामस्थांनी आपल्या घरातील शौचालय नागरिकांसाठी खुले केल्याने वारकऱ्यांची गैरसोय दूर झाली, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर ठेकेदाराने देहू, लोणी काळभोर आणि यवत गावी पालखी मुक्कामी फिरते शौचालय पुरवण्यात आले नसल्याचे उघडकीस आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आषाढी वारी पालखी सोहळयासाठी निर्मल वारीचे काम काळ्या यादीत समाविष्ट केलेल्या ठेकेदाराला दिले असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्त्यांनी यांनी माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर निर्मल वारीचे काम काळ्या यादीतील ठेकेदाराने वेळेत फिरते शौचालय न पुरविल्याबाबत शासनाकडून ठेकेदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२४) :** (१) होय, खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही. मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार अशा स्वरूपाची तक्रार मा. मुख्यमंत्री सचिवालय कार्यालयात आल्याचे दिसून येत नाही.

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्वी तालुक्यातील मौजा खुबगांव, मौजा दहेगांव (मु.) व मौजा गुमगांव, मौजा देऊरवाडा व नांदपुर तसेच मौजा लाडेगांव येथील ग्राम पंचायतीमध्ये झालेल्या अपहाराबाबत**

**(५०) ७१४५२ (२८-०८-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी विधानसभा मतदार संघातील मौजा खुबगांव, मौजा दहेगांव (मु.) व मौजा गुमगांव, मौजा देऊरवाडा व नांदपुर तसेच मौजा लाडेगांव येथील सन 2017 ते 2023 पर्यंतच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनीधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील ग्रामसेवक श्री. जगदिश केचे, श्रीमती लांबटोंगळे व श्रीमती राऊत हे अनेक वर्षापासून याच ग्रामपंचायती मध्ये कार्यरत असल्यामुळे व पंचायत समिती शाखा अभियंता श्री. तसरे यांचे सहकार्याने कामे न करता देयके उचल करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचायत समिती आर्वी शाखा अभियंता श्री. तसरे कुठल्याही प्रकारची पाहणी न करता व मोजमाप न करता ग्राम सेवकाचे म्हणण्यानुसार अंदाज पत्रक व देयके काढतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर ग्रामपंचायतीचे ऑडिट करून अपहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे , खरे नाही.

(३) हे, खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई .**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.